दि-१५/०९/२०२२

प्रति,
मा. राज्यपाल,
महाराष्ट्र राज्य, राजभवन,
मुंबई, महाराष्ट्र.

राज्यपालांचे सचिवालय, राजभवन
मुंबई - ४०० ०३५
पत्र प्राप्त झाले
15 SEP 2022
स्वाक्षरी
दूरध्वनी क्र. ०२२-२३६३२३४३

मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक 15/9/2022

प्रति,
मा. मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई

प्रति,
मा. मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई.

प्रति,
मा. सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र, राज्य, मंत्रालय, मुंबई

लिपिक,
सचिव, शा.शि.व.क्री.वि
यांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई-३२.

लिपिक
मंत्री
शालेय शिक्षण व मराठी भाषा
यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**प्रेषक,**
**नितीन रमेश दळवी,**
**१३२/बी, २/९, दामोदर हरिदास बिल्डिंग,**
**टी एच कटारिया मार्ग, माहीम,**
**मुंबई-४०००१६**
**फोन- ९९८७४२२३५९**

**विषय- "जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री देविदास महाजन यांना भ्रष्टाचारा प्रकरणी बडतर्फ करण्याचे व आर्थिक गुन्हे शाखे कडे हे प्रकरण पाठविण्याचे विधान परिषदेत २०२१ च्या तिसऱ्या हिवाळी अधिवेशनात दि २८/१२/२०२१ मा. शिक्षण राज्य मंत्री श्री बच्चू कडू यांनी दिलेले आश्वासन क्र ३१ ची परिपूर्ती आजतायागत न झाल्या मुळे या भ्रष्टाचारा प्रकरणी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याबाबत"**

**संदर्भ-**

१) विधान परिषदेत दिलेल्या आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीसंबंधी विवरणपत्र सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन (प्रत संलग्न पान १)

२)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी विषयांकित आश्वासनावर चौकशी व अहवाल सादर करण्यासाठी शिक्षण आयुक्त पुणे यांना पाठविलेले पत्र दि ०९/०२/२०२२ क्रमांक:विपआ-२०२२/प्र.क्र.२३/प्रशा-३ (प्रत संलग्न पान १)

३)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी विषयांकित आश्वासनावर चौकशी व अहवाल सादर करण्यासाठी शिक्षण आयुक्त पुणे यांना पाठविलेले स्मरणपत्र दि /१८/०४/२०२२ क्रमांक:विपआ-२०२२/प्र.क्र.२३/प्रशा-३ (प्रत संलग्न पान १)

४)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी मला पाठविलेले पत्र दि २४/०५/२०२२ क्रमांक:माअअ/-२०२२/प्र.क्र.११२/प्रशा-३ (प्रत संलग्न पाने २)

५) शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे यांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना पाठविलेले पत्र दि २४/०६/२०२२ (प्रत संलग्न पान १)

**मा. महोदय,**

मी **नितीन रमेश दळवी** आपल्या निदर्शनास आणू इचछीतो कि सन २०१५ ते २०१९ या कालावधीत जळगाव माध्यमिकचे तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री देविदास महाजन यांनी नियम डावलुन शिक्षकांच्या वैयत्तिक मान्यता देऊन भ्रष्टाचार केला व शासनाचे हि महसुली नुकसान केले, या प्रकरणी श्री देविदास महाजन यांना सेवेतून बडतर्फ करू असे आश्वासन मा. शिक्षण राज्यमंत्री श्री बच्चू कडू यांनी विधान परिषदेत २०२१ च्या तिसऱ्या हिवाळी अधिवेशनात दि २८/१२/२०२१ रोजी केले होते पण या आश्वासनाची अंमलबजावणी आजतायागत झालेली नसल्या मुळे, आश्वासनाची अमलबजाणी करण्यासाठी आपल्या पुढे पुढील मुद्दे सादर करीत आहे.

१)संदर्भ क्र १ मधील नमूद पत्रान्वये जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री देविदास महाजन यांना भ्रष्टाचारा प्रकरणी बडतर्फ करण्याचे व आर्थिक गुन्हे शाखे कडे हे प्रकरण पाठविण्याचे विधान परिषदेत २०२१ च्या तिसऱ्या हिवाळी अधिवेशनात दि २८/१२/२०२१ मा. शिक्षण राज्य मंत्री श्री बच्चू कडू यांनी आश्वासन दिलेले आहे, विधान परिषदेत मंत्रांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता शासन नियमानुसार ९० दिवसात करायची असते पण ८ महिने पूर्ण होऊन सुद्धा भ्रष्टाचारच ठपका असेलेले श्री देविदास महाजन यांच्यावर कारवाई करण्यात आलेले नाही, या वरून असे निदर्शनास येते कि श्री देविदास महाजन यांना पाठीशी घालण्यात येत आहे तसेच सरकारची भ्रष्टाचारी अधिकाऱ्या विरोधात कारवाई करण्याची इचछाशक्ती नाही, यात शालेय शिक्षण विभागातील अधिकारी तसेच पुणे शिक्षण आयुक्त सामील असण्याची दाट शक्यता आहे.

२)विषयांकित नमूद आश्वासनावर शालेय शिक्षण विभागाने संदर्भ क्र २ मधील नमूद मुद्द्यानुसार शिक्षण आयुक्त पुणे यांना चौकशी करून अहवाल पाठविण्याचे पत्र दि ०९/०२/२०२२ रोजी पाठविले व अहवाल दि १८/०२/२०२२ पूर्वी न चुकता पाठविण्याचे आदेश दिले.

३) संदर्भ क्र २ व वरील मुद्दा क्र २ अन्वये शिक्षण आयुक्त पुणे यांनी योग्य वेळेत अहवाल सादर न केल्यामुळे संदर्भ क्र ३ मध्ये नमूद असलेल्या पत्रानुसार शालेय शिक्षण विभागाने १८/०४/२०२२ रोजी शिक्षण आयुक्त पुणे यांना स्मरणपत्र पाठविले, या वरून असे निदर्शनास येते कि शिक्षण आयुक्त पुणे हे भ्रष्टाचाराचा ठपका असलेल्या श्री देविदास महाजन यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत होते व म्हणून ते अहवाल वेळेवर सादर करीत नव्हते व त्यांना स्मरणपत्र पाठवावे लागले.

४)सांदभ क्र ४ अनुसार मला पाठविलेल्या पत्रानुसार असे निदर्शनास येते कि जळगाव जिल्ह्यातील शिक्षण भ्रष्टाचाराप्रकरणी तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री देविदास महाजन यांना दि १४/०३/२०२० च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते, दि २९/०६/२०२० च्या आदेशान्वये त्यांना दि पुनर्स्थापित करण्यात आले होते , तसेच २२/०३/२०२१ आदेशान्वये भ्रष्टाचाराचा ठपका असलेल्या श्री देविदास महाजन यांना बढती देऊन शिक्षण निरीक्षक दक्षिण मुंबई या पदावर पददोन्नती देण्यात आली. भ्रष्टाचार प्रकरणी निलंबित असलेल्या अधिकाऱ्याला चौकशी न करता पुनर्स्थापिना करणे व कार्यकारी पदावर बढती देणे हा पण एका भ्रष्टाचार असून त्यावर पण कारवाई करू असे विषयांकित आश्वासनात देण्यात म्हटले आहे , पण अजून त्याची अंमलबजावणी झालेली नाही , या वरून असे निदर्शनास येते कि शालेय शिक्षण विभागात भ्रष्ट अधिकाऱ्यांची साखळीच कार्यान्वित आहे.

५) संदर्भ क्र ५ मधील नमूद मुद्द्यानुसार  दि २४/०६/२०२२ रोजी शिक्षण आयुक्तालय पुणे यांनी शालेय शिक्षण विभागाला पाठविलेल्या पत्रान्वये श्री देविदास महाजन यांनी केलेल्या भ्रष्टाचाराचा पूर्ण अहवाल सादर केलेला नाही तसेच शासनाचे झालेल्या महसुली नुकसानाची आकडेवारी  पण जाहीर केलेली  नाही. या वरून असे स्पष्ट दिसून येते कि भ्रष्टाचार प्रकरणी मंत्रांनी दिलेल्या आश्वासनावर कारवाई करण्याचे पुणे शिक्षण आयुक्त तसेच शालेय शिक्षण विभागातील अधिकारी टाळत आहेत, हा पण एक भ्रष्टाचार आहे.

**विषयांकित नमूद मुद्द्यावर व वरील नमूद संदर्भ व पात्रातील मुद्द्यावर माझी देशाचा नागरिक म्हणून पुढील पणे मागणी आहे.**

१) विषयांकित नमूद आश्वासनाची परिपूर्तीला दखलपात्र दिरंगाई झाल्यामुळे भ्रष्टाचारी अधिकारी श्री देविदास महाजन यांना ताबडतोब  निलंबित करून बडतर्फीची कारवाई ३० दिवसाच्या आत पूर्ण करावी,तसेच आश्वासनात नमूद केल्या प्रमाणे भ्रष्टाचाराचे  प्रकरण  आर्थिक गुन्हे शाखे कडे ३० दिवसांच्या आत पाठवावे.

२)संदर्भ क्र ४ व मुद्दा क्र ४ अनुसार भ्रष्टाचार प्रकरणी निलंबित अधिकाऱ्याला पुनर्स्थापित करणे, बढती करणे या मधील सामील असलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे आश्वासनात नमूद आहे तरी दोषी अधिकाऱ्यांवर शासन नियमानुसार ३० दिवसांच्या आत कारवाई करावी.

३) विषयांकित व संदर्भात नमूद असलेल्या मुद्द्यानुसार असे निदर्शनास येते कि शिक्षण आयुक्त पुणे यांनी भ्रष्टाचारप्रकारणी चौकशी व अहवाल सादर करण्यास व शासन आदेश पाळण्यास दखलपात्र दिरंगाई केली आहे आणि शासनाच्या झालेल्या महसुली नुकसानाचा आकडेवारी पण सादर केलेली नाही  तरी शासन नियमानुसार व भारतीय प्रशासकीय सेवेच्या नियमानुसार  पुणे शिक्षण आयुक्त यांच्यावर ३० दिवसांच्या आत  शिस्तभंगाची कारवाई करावी.

४) विषयांकित नमूद मा. मंत्रांनी विधान परिषदेत दिलेल्या आश्वासनाची  पूर्तता आजतायागत  झालेली नाही म्हणजेच जनतेची ची सरळ सरळ फसवणूक करण्यात आलेली आहे , आश्वासनपूर्तीत दिरंगाई करणाऱ्या सर्व अधिकारी तसेच पुणे शिक्षण आयुक्त (भा.प्र. से ) यांची उच्चस्तरीय चौकशी करून यांच्यावर ३० दिवसांच्या आत शासन नियमानुसार कारवाई करावी.

**विषयांकित नमूद आश्वासनाची व वरील ४ हि मागण्यांवर ३० दिवसांच्या आत कारवाई करावी व कळवावे अन्यथा या भ्रष्टाचार प्रकरणी न्याय प्रस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र शासन व शालेय शिक्षण विभागा विरोधात मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, याची कृपया नोंद घायवी. कळावे.**

आपला विश्वासु,

**(नितीन रमेश दळवी )**
ठिकाण : मुंबई

मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांना नम्र विनंती आहे कि आपण या गंभीर प्रकरणाची दाखल घ्यावी व संविधानाने आपल्याला बहाल केलेल्या अधिकारानुसार उचित कारवाई करावी, हि विनंती.

सोबत जोडले आहे- ५ हि संदर्भातील नमूद पत्र पाने एकूण ६.

विधानपरिषदेने दिलेल्या आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीसंबंधी विवरणपत्र
सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

कार्यासन फाईल क्र : ........................

विभागाचे नाव :- (शालेय शिक्षण) व क्रीडा विभाग

| आश्वासन क्रमांक | संदर्भ व दिनांक | विषय | आश्वासन | आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई | आश्वासन कधी पूर्ण करण्यात आले, त्याबाबतचे आदेश, निर्णय असल्यास त्याचा दिनांक (प्रत सोबत जोडावी) | आश्वासनाची पूर्ती केल्याचा दिनांक | आश्वासनपूर्ती करण्यासाठी लागलेल्या विलंबाचा कालावधी | आश्वासनपूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे | विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर केलेली कारवाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ३१ | विधानपरिषद कामकाज<br>खंड : २९७<br>क्रमांक : ३७<br>दिनांक : २८.१२.२०२१<br>माननीय मंत्री / : राज्यमंत्री<br>श्री.<br>यांनी दिलेले उत्तर | सातारा जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी [illegible] केलेला भ्रष्टाचार. श्री. [illegible] वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३४८ | मा. राज्यमंत्री / श्री. बच्चु कडू :- शिक्षणाधिकारी यांना पुन्हा सेवेत घेतले असेल तर त्यांना सेवेतून काढले जाईल. अंतिम चौकशीअंती निलंबन ऐवजी सेवेतून बडतर्फ केले जाईल. एवढेच नव्हेतर आर्थिक गुन्हे शाखेकडे हे प्रकरण पाठविले जाईल. | | | | | | |

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४१५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल-adm3.sesd-mh@gov.in

गोपनिय

क्रमांक : विपआ-२०२२/प्र.क्र.२३/प्रशा-३

दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०२२

प्रति,

आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषयः सन २०२१ च्या हिवाळी अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र. ३१
जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर
केलेल्या भ्रष्टाचारबाबत....

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सन २०२१ च्या हिवाळी अधिवेशनातील विधानपरिषदेत देण्यात आलेल्या आश्वासन क्र. ३१ ची प्रत सोबत जोडली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. श्री किशोर दराडे वि.प.स यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३४६ च्या अनुषंगाने सभागृहातील चर्चेवेळी मा. विधानपरिषद सदस्य यांनी सन २०१५ ते २०१९ या कालावधीतील जळगाव माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचेकडून ७५० वैयक्तिक मान्यता दिल्या आहेत. त्यापैकी ३५० मान्यता या नियम डावलून दिलेल्या आहेत. याप्रकरणी शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद जळगाव यांना निलंबित करण्यात आले होते. तथापि, त्यांना पुन्हा सेवेत रूजू करून घेतल्याने त्याबाबतचा खुलासा होणेबाबत विधान परिषद सदस्यांनी मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांच्याकडे विचारणा केली असता, सदर मुद्यावरील चर्चेच्या वेळी मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांनी "शिक्षणाधिकारी यांना पुन्हा सेवेत घेतले असेल तर त्यांना सेवेतून बडतर्फ केले जाईल. अंतिम चौकशीअंती निलंबन ऐवजी सेवेतून बडतर्फ केले जाईल. एवढेच नव्हे तर आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे हे प्रकरण पाठवले जाईल." असे असे आश्वासन दिले आहे.

सदर आश्वासनाच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेच्या प्रोसिडिंगची प्रत व टीएनटी-२ कार्यासनाकडून दि. २८/०१/२०२२ च्या पत्रान्वये प्राप्त अहवाल आपल्याकडे पाठविण्यात येत असून सदर आश्वासनाची पुर्तता करण्याच्या अनुषंगाने आवश्यक तपासणी आपल्या स्तरावर करण्यात यावी व त्याबाबतचा परिपुर्ण अहवाल/प्रस्ताव शासनास दि. १८ फेब्रुवारी, २०२२ पुर्वी न चुकता सादर करावा. तसेच सदर आश्वासनासंदर्भातील माहिती विहीत विवरणपत्रात सादर करावी.

(किसनराव पलांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्रः वरीलप्रमाणे

निर्गमित
दिनांक 9/2/22
लिपिकाची स्वाक्षरी V.J.Patil

माहितीचा अधिकार


नोंदणीकृत डाकेने

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४१५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
Email ID- adm3.sesd-mh@gov.in


---

क्रमांक : माअअ-२०२२/प्र.क्र.११२/प्रशा-३ दिनांक : २४ मे, २०२२

प्रति,

श्री. नितीन रमेश दळवी,
१३२/बी, २/९, दामोदर हरिदास बि,
टी एच कटारिया मार्ग, माहीम, मुंबई-४०० ०१६.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबत.
संदर्भ :- आपला दि.१६/०४/२०२२ चा माहिती मिळणे बाबतचा अर्ज.

महोदय,

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत आपला दि. १६/०४/२०२२ चा माहिती अधिकार अर्ज या कार्यासनास दि.२६/०४/२०२२ रोजी प्राप्त झाला आहे.

आपल्या संदर्भिय अर्जातील मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, श्री. देविदास महाजन, तत्का. शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. जळगाव यांना शासन आदेश दि.१४/०३/२०२० अन्वये निलंबित करण्यात आले होते. त्यांच्या निलंबनास ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने त्यांचे निलंबन उठवून शिक्षणाधिकारी (निरंतर), जि. प. चंद्रपूर या पदावर शासन आदेश दि.२९/०६/२०२० च्या आदेशान्वये पुनर्स्थापित करण्यात आले. तद्नंतर श्री. महाजन यांच्या पदस्थापनेत अंशतः बदल करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आल्याने त्यांना शासन आदेश दि.२२/०३/२०२१ अन्वये शिक्षण निरीक्षक, दक्षिण मुंबई या पदावर पुनर्स्थापित करण्यात आले आहे. श्री. महाजन यांचे प्रमोशन हा विषय या विभागाच्या प्रशासन-२ कार्यासनाशी संबंधित असल्यामुळे सदर माहिती मिळण्याकरीता अवर सचिव (प्रशा.२), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कृपया स्वतंत्र अर्ज करावा.

मुद्दा क्र. १ संदर्भातील आपण मागणी केलेली कागदपत्रे ही वैयक्तिक स्वरुपाची माहिती असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ पोटकलम (ञ) मधील तरतूदीनुसार व्यापक जनहिताशी संबंधित नसून, व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तपेक्ष करील, अशी वैयक्तिक तपशीला संबंधातील माहिती असल्याने सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक

दि. १७ ऑक्टोबर, २०१४ मधील तरतुदीनुसार आपणांस उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. त्याबद्दल दिलगिर आहे.

मुद्दा क्र.२ संदर्भात कळविण्यात येते की, मा. शिक्षण राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषदेत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्याकडून दि.[illegible] च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला आहे. (प्रत संलग्न)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार सदर माहिती कळविण्यात येत आहे. या प्रकरणी आपणास अपिल करावयाचे असल्यास प्रस्तुत पत्र आपणास प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव /प्रशासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अपिल करता येईल.

(किसनराव पलांडे)
जनमाहिती अधिकारी
तथा अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

सहपत्रः वरीलप्रमाणे

महाराष्ट्र शासन
शिक्षण आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे ४११ ००१

दूरध्वनी क्र.: ०२०-२६१२०१४१
ई मेल : educommoffice@gmail.com

दि. .०६.२०२२

जा.क्र. आस्था अ-१०३/नाशिक/बक्कल/ 2720

24 JUN 2022

प्रति,

मा.उपसचिव (प्रशा-३)
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई

विषय :- सन २०२१ च्या हिवाळी अधिवेशनामधील विधानपरिषद आश्वासन क्र.३१
जळगांव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर केलेल्या भ्रष्टाचाराबाबत.

संदर्भ :- १) माध्यमिक संचालनालयाचे पत्र क्र.३११८, दि.११/०५/२०२२
२) माध्यमिक संचालनालयाचे पत्र क्र.३११९, दि.११/०५/२०२२
३) माध्यमिक संचालनालयाचे पत्र क्र.३१२०, दि.११/०५/२०२२
४) शासन पत्र क्र. विपआ २०२२/प्र.क्र.१३/प्रशा-३, दि.०८/०६/२०२२

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, शासनाचे संदर्भ क्र.४ दि.०८/०६/२०२२ च्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प. जळगांव येथील सन २०१५ ते २०१९ या कालावधीतील वैयक्तिक मान्यता प्रकरणातील दोषींविरुध्द मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांनी दिलेल्या आश्वासनास सहा महिन्यांचा कालावधी झालेला असून आश्वासनाची पूर्तता १० दिवसात करणे बंधनकारक असल्याचे कळविले आहे. तसेच सदर प्रकरणातील आवश्यक कागदपत्रांसह दिनांक १३/०६/२०२२ रोजी उपस्थित राहणेबाबत निर्देश दिले होते.

तथापि, सदर प्रकरणातील अनियमित मान्यतांबाबत संचालनालयाचे संदर्भ क्र.१ ते ३ दि.११/०५/२०२२ अन्वये संबंधितांविरुध्दचा शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर केला आहेत. परंतु सदर प्रस्तावासोबत कोणतेही पुरावापत्रे सादर केलेले नाहीत. सदर अपूर्ण प्रस्ताव आश्वासनास अनुसरुन शासनास सादर करणे उचित होणार नसल्याने, या प्रकरणातील सर्व पुरावापत्रे सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. पुरावापत्रे प्राप्त करुन घेणेसाठी शिक्षण उपसंचालक नाशिक यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. तसेच या प्रकरणातील अनियमित मान्यता प्रकरणी शिक्षण उपसंचालक नाशिक यांना शासन निर्णय दि.२३/०८/२०२२ नुसार सुनावणी घेऊन निर्णय पारित करणेबाबत कळविण्यात आले आहे.

सबब, शिक्षण उपसंचालक नाशिक यांचेकडून सुनावणीअंती अनियमित मान्यता रद्द झालेनंतर, शासनावर एकूण पडलेल्या अनावर्ती आर्थिकभारासह व आवश्यक पुरावापत्रे प्राप्त करुन घेऊन संबधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करणेची कार्यवाही करण्यात येत आहे. या प्रकरणाची उक्त वस्तुस्थिती आश्वासन क्र.३१ च्या अनुषंगाने शासनास सविनय सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू
[signature]
(डॉ.अशोक भोसले)
शिक्षण सहसंचालक
(प्रशासन, अंदाज व नियोजन)